सकाळ



वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे डिप्लोमाच्या विजेत्या संघासोबत डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, प्राचार्य पी. आर. पाटील, एस. एस. चव्हाण, प्रा. एस. बी. पाटील, डॉ. एस. एम. पिसे, डॉ. डी. एन. माने आदी.

# तात्यासाहेब कोरे डिप्लोमा संघ बास्केटबॉल स्पर्धेत विजयी

वारणानगर, ता. ८ : राजेंद्र माने पॉलिटेक्निक, रत्नागिरीच्या वतीने आयोजित आय.ई.डी.एस.एस.ए. बी-१ झोन बास्केटबॉल स्पर्धेत तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिप्लोमा) महाविद्यालयाच्या बास्केटबॉल संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत विजय मिळवून झोन चॅम्पियन होण्याचा मान पटकावला.

या स्पर्धेत बी-१ झोनमधील विविध महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदविला. तात्यासाहेब कोरे डिप्लोमा संघाने प्रत्येक सामन्यात आक्रमक व नियोजनबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघांवर वर्चस्व प्रस्थापित केले. खेळाडूंच्या उत्स्फूर्त प्रतिसादात व मोठ्या उत्साहात स्पर्धा पार पडली.

विजयी संघामध्ये सार्थक मुदगल, अलोक भोसले, मेघराज राऊत, आयुष शेवले, साद मुल्ला, मनीष सूर्यवंशी, हर्षल सूर्यवंशी, आदिराज पारगावकर, सचिन पाटील, इंद्रजित सूर्यवंशी, श्रेराज पाटील या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या यशाबद्दल वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, प्राचार्य पी. आर. पाटील, प्राचार्य डॉ. डी. एन. माने यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. संघाच्या यशामध्ये प्राचार्य पी. आर. पाटील, क्रीडा शिक्षक एस. एस. चव्हाण, प्रा. एस. बी. पाटील, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
09/02/2026 Page No. 8